# मेट्रोचे आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंतचे भुयारीकरण पूर्ण

**वृत्तसंस्था**

मुंबई, शुक्रवार - कुलाबा-वांद्रे-सीप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल या ३.८१४ किमीचे भुयारीकरण आज पूर्ण झाले. केवळ २० महिन्याच्या काळात 'वैतरणा-१' या टनेल बोअरिंग मशीनने हा महत्त्वपूर्ण पल्ला गाठला. जमिनीच्या २० मीटर खाली भूगर्भात बेसाल्ट आणि ब्रेसिया या कठीण दगडातून मार्गक्रमण करीत यशस्वीरित्या हे काम पूर्ण करण्यात आले. याकरिता २७२० सेगमेंट रिंगचा वापर करण्यात आला. यामुळे डाऊनलाईन बोगदा पूर्ण करणारी मेट्रो-३ प्रकल्पातील वैतरणा ही पहिली टीबीएम मशीन ठरली आहे.

'मेट्रो-३'च्या मार्गातील हा १५ वा 'ब्रेक थ्रु' आहे. अतिशय वेगात आणि दिलेल्या वेळेत 'मेट्रो-३' या भुयारी मेट्रो मार्गाचे काम सुरू आहे. एचसीसी-मॉस्मेट्रोस्ट्रॉय समूहाद्वारे पॅकेज-२ अंतर्गत वैतरणा टीबीएम काम करीत आहे. भुयारीकरणाच्या दरम्यान 'वैतरणा -१' च्या मार्गात १४ उंच इमारती, २८ ऐतिहासिक वारसा वास्तू आणि अतिशय जुन्या इमारतींचा समावेश होता. सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेऊन हे भुयारीकरण पूर्ण करण्यात यश आले. भुयारीकरणाचे काम अतिशय आव्हानात्मक होते. पॅकेज-२चे काम आम्ही दिलेल्या वेळेत पूर्ण केल्याने आमचा आत्मविश्वास दुणावला असल्याची प्रतिक्रिया मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली. आतापर्यंत १७ टनेल बोअरिंग मशीनचा वापर करून ३१ किमी भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात राज्याचे मुख्य सचिव अजॉय मेहता, पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिल कुमार यांच्यासह मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, पश्चिम रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.